# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.08.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- राजकोट इथं नौदलाच्या सहकार्यानं छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य आणि मजबूत पुतळा उभारणार असल्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
- राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा; राज्यातल्या दोन शिक्षकांना पुरस्कार जाहीर
- दहीहंडीचा उत्सव राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा आणि
- पेशवा घराण्याचे वंशज डॉक्टर उदयसिंह पेशवे आणि ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचं निधन

## सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्ह्यात राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणं ही अत्यंत दु:खद घटना आहे; नौदलाच्या मदतीनं सरकार याच ठिकाणी भव्य आणि भक्कम पुतळा बसवणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या घटनेवरून कोणीही राजकारण करू नये असं आवाहन त्यांनी केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याचं कारण शोधण्यासाठी आणि पुतळा पुनर्स्थापित करण्यासाठी नौदलाचं एक पथक रवाना करण्यात आलं आहे. या संदर्भात राज्य सरकार आणि तज्ज्ञांच्या सहकार्यानं काम सुरू असल्याचं नौदलानं म्हटलं आहे. दरम्यान शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी काल मालवण-राजकोट इथं भेट दिली. पुतळा कोसळणं हा एक अपघात आहे आणि त्या दृष्टीनेच सर्वानी त्याकडे पाहावं असं आवाहन त्यांनी केलं. या अपघाताची चौकशी केली जाईल असं आश्वासन केसरकर यांनी यावेळी बोलताना दिलं. या प्रकरणात केंद्र आणि राज्य सरकारवर प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्याची मागणी कॉंग्रेस पक्षाने केली असून, आज ‘मालवण बंद’ची हाक दिली आहे. राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याच्या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. कराड इथं चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झालं; त्यावेळी ते बोलत होते. कॉंग्रेसचे विधानपरिषदेतले गटनेते सतेज पाटील यांनी या किल्ल्याला भेट देऊन दुर्घटनाग्रस्त जागेची पाहणी

केली. छत्रपतींचा पुतळा कोसळणं ही दुर्दैवी बाब असून सरकारने यासाठी जनतेची माफी मागावी असं पाटील म्हणाले. पुतळा कोसळण्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी काँग्रेसने कोल्हापूर, धुळे आणि नाशिकसह विविध ठिकाणी आंदोलन केलं.

**आशा कार्यकर्त्या**

आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांच्या कामाचं स्वरूप लक्षात घेता, कर्तव्य बजावत असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला, तर 10 लाख रुपये आणि कायमस्वरुपी अंपगत्व आलं, तर 5 लाख रुपयांचं सानुग्रह अनुदान लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या संदर्भातील शासन आदेश जारी करण्यात आला आहे. हा आदेश यावर्षी 1 एप्रिलपासून लागू करण्यासही  शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी आवश्यक असणारा निधी आगामी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**शिक्षक पुरस्कार**

केंद्र सरकारच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यंदा देशभरातील 50 शिक्षकांना या पुरस्कारांनं सन्मानित करण्यात येणार आहे; यात महाराष्ट्रातल्या दोन शिक्षकांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके; तसंच कोल्हापुरातील स. म. लोहिया माध्यमिक शाळेतील कलाशिक्षक सागर बगाडे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या पाच सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**शिक्षक पुरस्कार**

पुरस्कार जाहीर झाल्यानंतर कोल्हापूरचे कलाशिक्षक सागर बगाडे यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.........

**दहीहंडी**

राज्यात सर्वत्र काल दहीहंडीचा उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबई, ठाणे आणि पुणे शहरात उंचच उंच बांधलेल्या हंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथकांमधे चुरस दिसून आली. अनेक ठिकाणी गोविंदा पथकांनी नऊ तसंच दहा थर रचले.  ठिकठीकाणच्या दहीहंडी मंडळांना राजकीय नेते, अभिनेते, कलावंतांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.
ठाण्यातील टेंभी  नाका इथे आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली. गोविंदा पथकांनी दही हंडी फोडताना सर्व प्रकारची सुरक्षा बाळगण्याचं घेण्याचं

आवाहन त्यांनी केलं. मुंबईतील अंधेरीतल्या वेसावे कोळीवाड्यात लाकडी काठीला टोकदार भाला बांधून दहीहंडी फोडण्याची परंपरा आहे. इथल्या कोळी समाज संस्थेचे अध्यक्ष विरेंद्र मासळी यांनी ही दहीहंडी फोडली. मुंबईत विविध ठिकाणी झालेल्या दहीहंडी उत्सवात शंभरहून अधिक गोविंदा जखमी झाल्याची माहिती महापालिकेनं दिली आहे. पुण्यात विविध मंडळांनी आयोजित केलेल्या दहीहंडी उत्सवात तरुणाईचा जल्लोष पाहायला मिळाला. नाशिक शहरातील पुरातन मुरलीधर मंदिरासह अन्य सर्व कृष्ण मंदिरांमध्ये कृष्ण जन्माष्टमी आणि दहीकाला उत्साहात पार पडला. अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी इथं श्री साईबाबा संस्थानच्यावतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि दहीहंडी उत्सव पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्यात आला. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**गुन्हा**

राज्याचे माजी पोलिस महासंचालक संजय पांडे यांच्यासह सहा जणांविरुद्ध, बेकायदेशीर कृत्यांच्या आरोपांवरून ठाणे नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मुंबईतले व्यावसायिक संजय पुनामिया यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल केला असल्याचं ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सांगितलं.

**बैठक**

वैद्यकीय व्यवसायातल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत शिफारशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक काल नवी दिल्लीत झाली. कॅबिनेट सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या कृती दलाकडे सूचना नोंदवण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं “Suggestions to NTF” या नावाने नवीन पोर्टल सुरू केलं आहे. यासंदर्भात राज्य सरकारांनी आपापल्या राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांमधे किंवा रुग्णालयांमधे केलेल्या सुरक्षा उपाययोजनांची माहितीही आरोग्य मंत्रालयानं मागवली आहे.

**पेशवे-निधन**

पेशवा घराण्याचे वंशज आणि पुण्यातील श्री देवदेवेश्वर संस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त डॉक्टर उदयसिंह पेशवे यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. वैकुंठ स्मशानभूमीत काल रात्री त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पुणे विद्यापीठात त्यांनी अनेक वर्षं भूगर्भशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून मोठं योगदान दिलं. भूजलसाठ्याचा अभ्यास, संशोधन यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला.

**सुहासिनी देशपांडे-निधन-जळूकर**

ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचं काल पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं; त्या 81 वर्षांच्या होत्या. गेली अनेक दशकं मराठी आणि हिंदी कलाविश्वात त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली होती. माहेरचा आहेर, मानाचं कुंकू, आज झाले मुक्त मी; अशा मराठी चित्रपटात, तसंच ‘कथा अकलेच्या कांद्याची’, ‘राजकारण गेलं चुलीत’, ‘लग्नाची बेडी’ या नाटकांमध्ये त्यांनी भूमिका केल्या.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात कालही जोरदार पाऊस झाला. सततच्या पावसामुळे कोयना धरणातील पाणी पातळीत वाढ झाली असून धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तसेच कण्हेर आणि उरमोडी धरणातून देखील विसर्ग सुरु असल्यानं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाचा जोर कमी झाला आहे. गंगापूर धरणातून सुरू असलेला पाण्याचा विसर्गही कमी करण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून होत असलेल्या संततधार पावसामुळे शहरी तसेच ग्रामीण भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतांमध्ये पाणी साचून पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच अनेक घरे कोसळून मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी देखील झाली आहे. नुकसानाचे पंचनामे करण्याच्या सूचना आमदार कुणाल  पाटील यांनी दिल्या आहेत.रत्नागिरी जिल्ह्यात सध्या ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. अधूनमधून पावसाच्या खूप जोरदार सरी कोसळत असून, पावसासोबतच वेगवान वारेही वाहत आहेतपुणे शहर आणि परिसरातही काल दिवसभर पावसाच्या मध्यम सरी पडत होत्या.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि विदर्भात वीजांसह तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**